डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
अखिल भारतीय समन्वयीत सोयाबीन संशोधन प्रकल्प
मुख्य सोयाबीन संशोधन केंद्र, प्रादेशीक संशोधन केंद्र, मोर्शी रोड, अमरावती – ४४४६०३ (महा.)

डॉ. एस. एस. निचळ
प्रमुख

फोन नं. (०७२१) २९७०१७९
ई मेल : rrc_amt@rediffmail.com

प्रा.सं.के.अम./प्रक्षेत्र/265/2025 दि: 26/05/2025

# निविदा सूचना

**सन २०२५-२६ हंगामामध्ये बिजोत्पादन प्रक्षेत्रावरील पिकांची राखणी करण्यासाठी प्रति हेक्टर प्रमाणे दर निविदा (कोटेशन) पुरविण्याबाबत**

| अ.क्र. | करावयाचे काम | कामाचा तपशील | दर रू. |
|---|---|---|---|
| १ | प्रक्षेत्रावरील पिक राखणे | १० हेक्टर व प्रति दिवस (२४ तासाकरिता, तीन पाळी मध्ये ) | |

वरील कामे कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ६.०० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन **प्रमुख, प्रादेशिक संशोधन केंद्र (डॉ.पं.दे.कृ.वि.), मोर्शी रोड, अमरावती** यांचे नावाने सीलबंद लिफाफ्यामधे पाठवावी.
३. कंत्राटदाराकडे वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेचे प्रमाणपत्र, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र, GST व इतर सर्व आवश्यक कागदपत्रे निविदा दर पत्रकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.
४. निविदा/कोटेशन मधील संबंधित कामे कंत्राट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच सर्व कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील. करा संबंधी कोणतीही तक्रार आल्यास विद्यापीठ जवाबदार राहणार नाही.
५. कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन क्षेत्रातील पीक राखणीची कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.
६. कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन क्षेत्रातील पीक राखणीची कामे करीत असतांना पिकांचे/फळबागेचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.
७. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन क्षेत्रातील पीक राखणीची कामे करीत असतांना कुठलीही दुर्घटना /अपघात /जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

८. विभागावर देण्यात आलेले बिजोत्पादन क्षेत्रातील पीक राखणीची कामे पूर्णवेळ करण्यात यावी, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम समाधानकारक नसल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

९. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

१०. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

११. या कार्यालयातर्फे कंत्राटदारास प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन क्षेत्रातील पीक राखणीची कामे करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. संबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१२. कंत्राटदारास प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन क्षेत्रातील पीक राखणीच्या कामाचे देयक काम पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

१३. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन क्षेत्रातील पीक राखणीची कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे, कामगारांबाबतच्या सरकारी नियम व कायद्याचे पालन करणे तसेच सर्व प्रकारच्या करांचा नियमाप्रमाणे व नियमित भरणा करून तसे दस्तावेज कार्यालयास सादर करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१४. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन क्षेत्रातील पीक राखणीची कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१५. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन क्षेत्रातील पीक राखणीची कामे हि खरीप व रबी हंगामाकरिता असून कामाचे दर हे ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध राहतील.

१६. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन क्षेत्रातील पीक राखणीची कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावेत.

१७. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे रु. ५०० चे स्टंप पेपर वर करारनामा सादर करणे संबंधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१८. वरीलप्रमाणे अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविदा धारकांनी निविदातपशिला नुसार दर निविदा सीलबंद लीफाफ्यामध्ये दिनांक **०४/०६/२०२५** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावी.

**प्रमुख**
**प्रादेशिक संशोधनं केंद्र**
**अमरावती**